क्रमांकः-   ७४/५/०६
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला,
८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई ४०० ०१८.

दिनांकः- ३/१०/२००६.

**<u>परिपत्रक क्रमांक</u> ३२२.**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, विभागीय सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडून होणारी अंशदान वसुली बाबतची कार्यवाही योग्यरित्या पार पाडली जात नाही. न्यासाकडून जमा होणारे अंशदान वेळीच भरणा करण्यात येत नाही. तसेच हिशोबपत्रके सुध्दा वेळीच दाखल केली जात नाही. काही न्यासाकडून नोंदणीपासूनची हिशोबपत्रके दाखल केलेली नाहीत व अंशदनाही भरणा केलेले नाही. त्यामुळे धर्मादाय संघटनेच्या अंशदानाच्या थकबाकीत दिवसेंदिवस वाढ होत आहे ही बाब अत्यत गंभीर आहे. या परिपत्रकाव्दारे आपणास कळविण्यात येते की, जे अंशदान थकीत आहे त्याची वसुली मासिक ठराविक उद्दीष्टे नजरेसमोर ठेवून जास्तीत जास्त करण्यात यावी. जे अधिकारी/कर्मचारी थकीत अंशदान वसुलीबाबत वरील निर्देशाचे अनुपालन करणार नाहीत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत गंभीर नोंद घेण्यात येईल व त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. तसेच जे अधिकारी/कर्मचारी त्यांना नेमून दिलेल्या ठराविक उद्दीष्टापेक्षा अधिक चांगली कामगिरी करतील अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कर्तव्यपूर्तीबाबत विशेष नोंद घेण्यात येईल.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
१. धर्मादाय सह आयुक्त,
२. सहायक धर्मादाय आयुक्त.